प्रेस नोट ता. १४/०४/२०१९

**हडपसर पोलीसांकडून दरोडयाच्या तयारीत असणाऱ्या एकुण ०४ आरोपींना अटक व अटक आरोपीकडून १,८६,२२०/- रुपये किंमतीचे एक देशी बनावटीचे पिस्टल,दोन जिवंत काडतुसे व इतर मुददेमाल जप्त**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पुणे शहरातील वाहन चोरी, जबरी चोरी व घरफोडी चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन, चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीतील चोरीच्या गुन्हयास आळा बसविण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री तांबे यांचे मार्गदर्शनाखाली आंबेडकर जयंती निमित्ताने हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत तपास पथकाचे अधिकारी सपोनि चव्हाण व तपास पथकातील स्टाफसह हडपसर पोलीस ठाणे हद्यीत गुन्हेप्रतिबंधक पेट्रोलींग करीत असताना फिरत फिरत हडपसर गाव पुणे येथे आलो असता अंदाजे रात्रौ ११/२० वाजण्याचे सुमारास पो.शि.नितीन मुंढे व पो. शि. अमोल कदम यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सात ते आठ इसम मोटार सायकली घेवुन ओव्हर ब्रिजच्या बाजुला, रेल्वे लाईनच्या जवळ, कपडयाचे गोडावुनच्या पाठीमागे मोकळया जागेत फुरसुंगी पुणे येथे थांबलेले असुन ते आपआपसात कपडयाचे दुकान फोडण्याबाबत चर्चा करीत असुन त्यांचेजवळ घातक शस्त्र असुन ते दरोडा टाकण्याचे तयारीत आहेत अशी बातमी मिळाल्याने लागलीच सदर ठिकाणी तपास पथकातील अधिकारी श्री चव्हाण व तपास पथकातील स्टाफसह सापळा लावुन इसम नामे १) भिमराव श्रीकृष्ण शिंदे, वय २६ वर्षे, रा. महादेवनगर, ढेरे बंगल्यासमोर, शिवशाही हॉटेलसमोर, मांजरी बुा, ता. हवेली, जि. पुणे २) गोपाळ संजय यादव, वय १९ वर्षे, रा. घोलप यांच्या बिल्डींगमध्ये भाडयाने, कटके वस्ती, काळुबाई मंदिराजवळ, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे ३) परशुराम मच्छिंद्र मॅकल, वय २० वर्षे, रा. कामाठी पुरा, हनुमान मंदिराशेजारी, तेली दादा दुकानासमोर, ता. शिरुर, जि. पुणे ४) शुभम विजय पांचाळ, वय २० वर्षे, रा. कोंद्रे नगर, कुदळे बिल्डींग शेवाळवाडी, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे यांना पकडून त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी त्यांचे पळून गेलेले साथीदार १) शुभम दिनकर खांदवे रा. गोंधळेनगर हडपसर पुणे २) कृष्णा सुभाष बळूरगी रा. हांडेवाडी रोड, उदयोग नगर श्रीराम चौक गल्ली नं.१ हडपसर पुणे, ३) मुसेफ शफीक सय्यद रा. कॉलनी नं. ३ सय्यद बिल्डींग दुसरा मजला हडपसर पुणे ४) कुणाल सुधाकर चौरे रा. भेकराईनगर आईस कॉम्पलेक्स फुरसुंगी पुणे यांचेसह कपडयाचे गोडावुन वर दरोडा टाकुन तेथील पैसे, कपडे व किंमती वस्तु लुटणार होतो असे सांगितल्याने वरील आरोपीत यांचेविरुध्द हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३३७ /२०१९ भादविक ३९९,४०२ सह आर्म अॅक्ट कलम ३(२५), ४(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला व त्यामध्ये अ. नुं. १ ते ४ यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आले आहे.पाहीजे आरोपीत अ. नुं १ ते ४ यांचा शोध घेणे चालु आहे.

**अटक आरोपी यांचे ताब्यातुन एक देशी बनावटीचे पिस्टल मॅग्झीनसह, दोन जिवंत काडतुसे, लोखडी कोयता, कटावणी, एक्सा ब्लेड, स्क्रु ड्रायव्हर, एक मिरची पुडी,**

एक नायलोनची पिवळी रंगाची दोरी, व पाच मोटार सायकली असा एकुण १,८६, २२०/- रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पोलीस हवा. ३६८६ संपत औचरे, पो. हवा. ५५६२ राजेश नवले, पो. ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. ५८९४ प्रमोद टिळेकर, पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो. ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. ना. ५७९१ राजु वेगरे, पो. ना. ५८५३ गणेश दळवी, शि. ७३१७ नितीन मुंढे, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो. शि.७६८४ शंशिकांत नाळे,पो.शि.अमोल कदम,पो.शि.७६६८शरद धांडे यांनी केली आहे.